महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमधील Certificate Course in Modern Pharmacology (CCMP) अर्हताधारक डॉक्टरांच्या नोंदणीशी संबंधित कार्यक्षमता, निष्काळजीपणा हाताळणी कार्यपद्धती (SOP) व नैतिक चौकट निश्चित करण्यासाठी समिती गठित करणेबाबत

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
शासन निर्णय क्रमांकः MEDD-१४०२१(१)/८/२०२६-MMD(Adhi) (ई:-१७३६४०९)
गो.ते.रुग्णालय आवार, ९ वा मजला, लोकमान्य टिळक मार्ग
नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१
तारीख: ०३ ऑगस्ट, २०२६

वाचा :-

१) शासन अधिसूचना, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, दिनांक २५/०६/२०१४
२) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचा अंतरिम अर्ज क्र. ३५४८/२०२५ मधील आदेश, दिनांक १७/०९/२०२५.
३) शासन पत्र क्र.MEDD-१४०८(१)/५/२०२४-MMD (ADHI)/१२२८२२३, दि.०५/०९/२०२५
४) शासन पत्र क्र. नोंदणी-११२५/प्र.क्र.३६१/अधिनियम, दि.२५/११/२०२५
५) मा. मंत्री, वैद्यकीय शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २८/०७/२०२६ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

प्रस्तावना :-

शासन अधिसूचना दिनांक २५/०६/२०१४ अन्वये महाराष्ट्र होमिओपॅथिक प्रॅक्टिशनर्स अधिनियम व महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल अधिनियम, १९६५ मध्ये सुधारणा करण्यात आली असून, राज्य शासनमान्य Certificate Course in Modern Pharmacology (CCMP) उत्तीर्ण अर्हताधारकांकरिता महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमार्फत स्वतंत्र नोंदवही ठेवण्याची तरतूद करण्यात आली आहे. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी अंतरिम अर्ज क्र. ३५४८/२०२५ मध्ये दिनांक १७/०९/२०२५ रोजी पारित केलेल्या आदेशान्वये, CCMP अर्हताधारक उमेदवारांना रिट याचिका क्र. ७८४६/२०१४ व ७८४७/२०१४ मधील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून नोंदणी देण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच यानुषंगाने शासनाच्या दि.०५/०९/२०२५ व दि. २५/११/२०२५ च्या पत्रान्वये मा. उच्च न्यायालयाच्या अंतिम आदेशाच्या अधीन राहून नोंदणीसंदर्भातील कार्यवाही करणेबाबत महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलला कळविण्यात आले आहे.

संदर्भ क्र. ३ येथील दिनांक २८/०७/२०२६ रोजीच्या बैठकीत, CCMP अर्हताधारक बी.एच.एम.एस. डॉक्टरांची सशर्त नोंदणी सुरू करतानाच, सदर अर्हताधारकांची कार्यक्षमता, वैद्यकीय नैतिकता व निष्काळजीपणा प्रकरण हाताळणी कार्यपद्धती इ. बाबी निश्चित करण्यासाठी मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली एक स्वतंत्र समिती गठित करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्या अनुषंगाने सदर समिती गठित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णयः-

महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमधील CCMP अर्हताधारक डॉक्टरांच्या नोंदणीशी संबंधित कार्यक्षमता, निष्काळजीपणा हाताळणी कार्यपद्धती व नैतिक चौकट निश्चित करण्यासाठी याद्वारे खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे:-

अ.क्र.	सदस्याचे पदनाम	समितीमधील पद
१	आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई	अध्यक्ष
२	संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांनी नामनिर्देशित केलेले तांत्रिक सदस्य	सदस्य
३	संचालक, आयुष संचालनालय यांनी नामनिर्देशित केलेले तांत्रिक सदस्य (होमिओपॅथी शाखा)	सदस्य
४	कुलसचिव (Registrar), महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक	सदस्य
५	निबंधक (Registrar), महाराष्ट्र होमिओपॅथी परिषद, मुंबई	सदस्य
६	प्रबंधक (Registrar), महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल, मुंबई	सदस्य सचिव

समिती अध्यक्षांना आवश्यकतेनुसार समितीच्या बैठकांना तज्ञांना आमंत्रित करण्याचे अधिकार राहतील.

समितीची कार्यकक्षा :

सदर समितीने खालील बाबींबाबत अभ्यास करून शासनास शिफारस करावी :-

अ) BHMS-CCMP अर्हताधारक डॉक्टरांच्या नोंदणीशी संबंधित कार्यक्षमता (Competencies) अभ्यासक्रमानुसार निश्चित करणे.

ब) BHMS-CCMP अर्हताधारक नोंदणीकृत डॉक्टरांविरुद्ध प्राप्त होणाऱ्या निष्काळजीपणा (Negligence) प्रकरणांच्या हाताळणीबाबतची प्रमाणित कार्यपद्धती (SOP) निश्चित करणे.

क) BHMS-CCMP नोंदणीशी संबंधित वैद्यकीय नैतिक भूमिका व नैतिक चौकट (Ethical Role / Structure) निश्चित करणे.

ड) BHMS-CCMP नोंदणीशी संबंधित इतर अनुषंगिक बाबींबाबत आवश्यक त्या शिफारशी करणे.

इ) महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेमधील स्वतंत्र नोंदवहीत नोंदणी केल्यामुळे महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेतील निवडणूक प्रक्रियेमध्ये भाग न घेता येणे व इतर संबंधित विषय.

कालावधी व कार्यपद्धती :

१. सदर समितीने हा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत आपला अहवाल व शिफारशी शासनास सादर कराव्यात. समितीच्या शिफारशींच्या आधारे शासनामार्फत आवश्यक ते आदेश निर्गमित करण्यात येतील.

२. समितीवरील अशासकीय सदस्यांना, लागू असल्यास, प्रवास भत्ता व दैनिक भत्ता प्रचलित शासन नियमांनुसार अनुज्ञेय राहील.

३. समितीच्या बैठकांवरील खर्च महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेमार्फत करण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८०३१८३५०५०३५१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUVARNA SIDDHARTH KHARAT

Digitally signed by SUVARNA SIDDHARTH KHARAT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Medical Education and Drugs, 2.5.4.20=CDF8435B14113EF43D22F63F448B2DB4109F1AA98EDA5F3B78841F6BC40A437B, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=35F57024DD03B25B43EA1F6F39E191F897508AEF3C68A8BD9209A39DD656B14C, cn=SUVARNA SIDDHARTH KHARAT
Date: 2026.08.03 19:26:31 +05'30'

(डॉ. सुवर्णा खरात)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. मंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. राज्यमंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई (अध्यक्ष).

४) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
५) संचालक, आयुष संचालनालय, मुंबई.
६) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
७) निबंधक, महाराष्ट्र होमिओपॅथी परिषद, मुंबई.
८) प्रबंधक, महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, मुंबई (सदस्य सचिव).
९) निवडनस्ती (अधिनियम).